स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानवविज्ञान शाखेतील राज्यशास्त्र विषयात
पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणारा..

प्रारूप संशोधन आराखडा

शोध प्रबंध

“भारताची सुरक्षितता आणि विकासात हिंद महासागराचे महत्व– एक अध्ययन”

संशोधक

गुलाब चांदसाहेब आळगी.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. वाय.आर. वळवी.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.

ऑगस्ट 2023

“भारताची सुरक्षितता आणि विकासात हिंद महासागराचे महत्व– एक अध्ययन”

प्रस्तावना:

आपण ज्या पृथ्वीवर राहतो त्याचा 70 टक्के भूभाग हा पाण्याने व्यापलेला आहे, ज्याला आपण जलावरण असे म्हणतो. पृथ्वीच्या या जलावरणामध्ये पाच महासागराचे अस्तित्व आहे. यामध्ये सर्वात मोठा प्रशांत महासागर असून सर्वात लहान आर्किट महासागर आहे. जलावरणातील 20 टक्के भाग व्यापलेल्या हिंद महासागर हा एकमेव असा महासागर आहे ज्याचे नाव भारताच्या नावावरून ठेवण्यात आला आहे. संस्कृत मध्ये हिंद महासागराला रत्नाकर असे म्हटले आहे.

हिंद महासागर प्रदेश हा जगातील सर्वात दाट लोकसंख्येचा प्रदेश आहे. समृद्ध लोकसंख्येबरोबरच या प्रदेशात नैसर्गिक साधन संपत्तीचा ही विशाल भंडार आहे. गेल्या काही दशकांमध्ये हिंद महासागर क्षेत्रातील राष्ट्रआर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या विकसित झाले आहेत. त्यामुळे ती राष्ट्र जगाच्या राजकारणात आपला प्रभाव पाडण्यात सक्षम झाली आहेत.

भारत हा देश याच महासागराच्या तटावर वसलेला असून भारताच्या तीन बाजूंनी हा समुद्र वेढलेला आहे. भारतासाठी हा सागर नसून भूत, वर्तमान आणि भविष्य काळातील समृद्धी आणि शांतीचा मार्ग आहे.

हिंदी महासागर हा पृथ्वीच्या दक्षिण गोलार्धात वसलेला असून याचा पूर्व पश्चिम–विस्तार 10000 किलोमीटर पर्यंत आहे. या महासागराच्या उत्तरेला आशिया, दक्षिणेला दक्षिण समुद्र, पूर्वेस ऑस्ट्रेलिया आणि पश्चिमेस आफ्रिका खंड आहे. म्हणजेच आशिया, आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या तीन खंडानी हिंद महासागर जोडलेला आहे. हिंद महासागराचे क्षेत्रफळ 29 21 31 000 घन कि.मी इतका असून याच्या तटावर 47 राष्ट्र व 1200 बेट आहेत.

या महासागरामध्ये अनेक महत्त्वाचे सामुद्रधुनी, आखात, खाडी, प्रचंड खनिज साठा, जलवाहतूक आणि व्यापारी मार्ग उपलब्ध आहेत. व्यापाराच्या दृष्टीने या महासागराचे विशेष महत्त्व असून जगाचा एकूण व्यापारापैकी 80 टक्के व्यापार एकट्या हिंद महासागरातून होतो. त्या दृष्टीने होर्मुज, मलाक्का आणि बाब अल मांदेव सामुद्रधुनी महत्त्वाच्या आहेत. आर्थिक आणि भूराजकीय दृष्टीने सामरिक महत्त्वामुळे हिंद महासागराने जगाचे लक्ष वेधून घेतले आहे.

भारताचे स्थान हिंद महासागराच्या उत्तरेला मध्यवर्ती ठिकाणी आहे. हिंदी महासागर दक्षिण भारताच्या तीन बाजूंनी व्यापलेला आहे. भारतातील नऊ राज्ये आणि चार केंद्रशासित प्रदेशाचा संबंध या महासागराशी येतो. भारताची जल सीमा गुजरात राज्यापासून पश्चिम बंगाल राज्यापर्यंत एकूण 7517 किलोमीटर आहे. हिंद महासागरात वसलेले अंदमान व निकोबार द्वीपसमूह तसेच लक्षद्वीप बेटे भारतीय मालकीची आहेत. म्हणजेच भारत हा एक सामुद्रिक राष्ट्र असून हिंद महासागरातील घडामोडीचा थेट परिणाम भारतावर होतो.

भारताचे आर्थिक, व्यापारी, राजकीय, लष्करी आणि राजनैतिक हितसंबंध या महासागराची निगडित आहेत. म्हणजेच या महासागराच्या परिसरातील शांतता, सत्तासंतुलन आणि मैत्रीपूर्ण संबंध यावरच भारताची प्रगती अवलंबून आहे. परंतु सद्यस्थितीत हिंद महासागर परिसरात सत्ता स्पर्धा वाढलेली असून त्याचा थेट परिणाम भारताच्या सुरक्षा आणि विकासावर होत आहे. हिंदी महासागरातून मिळणाऱ्या आव्हानाला सामोरे जात असताना आणि राष्ट्राच्या अखंडत्व व सार्वभौमत्वचे रक्षण करत असताना हिंद महासागर कसा उपयुक्त आहे याचा अभ्यास प्रस्तुत विषयात करण्यात येणार आहे.

संशोधनाची गरज व महत्त्व:-

प्रचंड खनिज संपत्ती, वायूचे साठे, इतर सागरी संसाधने, सुरक्षित जलमार्ग त्यामुळे हिंद महासागर परिसरात व्यापार खूप वाढलेला आहे. जगातील मोठी राष्ट्रे हिंद महासागरावर नियंत्रण प्रस्थापित करून आपले हितसंबंध साध्य करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या प्रयत्नाचा एक भाग म्हणून हिंद महासागरातील बेटावर ते लष्करी तळ उभारत आहेत. त्यामुळे हिंद महासागराचे लष्करी करण होऊन सत्ता स्पर्धा वाढलेली आहे. या सत्ता स्पर्धांमुळे हिंद महासागर परिसरातील राष्ट्राच्या अखंडत्व व सार्वभौमत्व धोक्यात आलेला आहे.

सागरी अशांतता आणि सत्ता स्पर्धा यामुळे भारताच्या हितसंबंधांना बाधा येऊन प्रगतीत अडथळा निर्माण झालेला आहे. भारत हा हिंद महासागराच्या तटावर वसलेला देश असून त्याचा विकास या सागरावर अवलंबून आहे. हिंद महासागराचा भारतासाठी उपयुक्तता काय याचं चिंतन करण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

१) हिंद महासागरातील उपलब्ध संसाधनाचा आढावा घेणे

२) हिंद महासागरात भारताचे भू-राजनैतिक स्थानाचा आढावा घेणे

३) भारताच्या सुरक्षा आणि विकासात हिंद महासागराचे योगदान अभ्यासणे.

४) जागतिक राजकारणात हिंद महासागराची उपयुक्तता अभ्यासणे.

५) हिंद महासागरातील सत्ता स्पर्धेत भारताच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके:

१) हिंद महासागर क्षेत्र आंतरराष्ट्रीय आर्थिक विकासाचे केंद्र आहे.

२) भारताच्या सुरक्षा आणि विकासात हिंद महासागराचे योगदान आहे.

३) भारत हिंद महासागर क्षेत्रात सामूहिक विकासावर भर देतो.

४) हिंदी महासागर क्षेत्रातील सत्ता स्पर्धेचा भारताच्या विकासावर नकारात्मक परिणाम होतो.

५) हिंद महासागरातील सत्ता संतुलनात भारताची भूमिका महत्त्वाची आहे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासाकरिता संख्यात्मक व गुणात्मक तसेच प्राथमिक व दुय्यम साधनांचा विश्लेषणात्मक पद्धतीचा वापरण्यात येईल. विषयाशी संबंधित संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रातील लेख, नकाशे इत्यादी साधनांचा उपयोग करण्यात येईल. ज्यामुळे संशोधनाची विश्वसनीयता वाढण्यास मदत होईल.

माहिती संकलनाची साधने:

संशोधानासाठी आवश्यक माहिती संकलित करण्यासाठी पुढील साधनांचा वापर करण्यात येइल.

१) प्राथमिक स्त्रोत :- प्रश्नावली, अनुसूची व मुलाखत.

२) दुय्यम स्त्रोत :- संदर्भ साहित्य, मासिके, विश्वकोश, शासकीय अहवाल, वर्तमान पत्रातील लेख, ब्लॉग, नकाशे,

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

प्रस्तुत संशोधन **"भारताची सुरक्षितता आणि विकासात हिंद महासागराचे महत्त्व एक अध्ययन"** या शीर्षकाखाली करत असून याच्या व्याप्ती मध्ये हिंदी महासागराचे ऐतिहासिक भूराजकीय स्थिती, भारताच्या सुरक्षिततेत आणि विकासात हिंद महासागराचे महत्त्व, हिंद महासागरात आंतरराष्ट्रीय घडामोडीचा आणि त्याचा भारताच्या विकासावर आणि सुरक्षिततेवर पाडणाऱ्या प्रभावा चर्चा केली आहे. भारताच्या दृष्टीने हिंद महासागर कसा उपयुक्त आहे याचा आढावा घेतला आहे. समुद्रमार्गे भारतासाठी मिळणारे आव्हाने आणि भारताची रणनीती याची चर्चा केली आहे.

संशोधनाची रूपरेषा / कार्यपद्धती:

१) प्रस्तावना.

२) हिंद महासागराचे ऐतिहासिक भूराजकीय स्थितीचा आढावा.

३) जागतिक राजकारणात हिंद महासागराची उपयुक्तता.

४) भारताच्या सुरक्षा आणि विकासात हिंद महासागराचे योगदान.

५) हिंदी महासागर आणि भारत आजची स्थिती.

६) सारांश व निष्कर्ष.

प्रकरणाची रूपरेषा:

प्रकरण पाहिले– प्रस्ताविक

विषयाचा थोडक्यात आढावा, विषय निवडण्याची भूमिका, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, व्याप्ती व मर्यादा या सर्व घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे– हिंद महासागराचे ऐतिहासिक भूराजकीय स्थितीचा आढावा.

हिंद महासागराचे ऐतिहासिक, भौगोलिक, पार्श्वभूमी, भूराजकीय स्थिती, स्थान, विस्तार याचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण तीसरे– जागतिक राजकारणात हिंद महासागराची उपयुक्तता.

जागतिक राजकारणात हिंद महासागराचे महत्त्व, सागरी संसाधन, खनिज संपत्ती, व्यापारी मार्ग, जागतिक व्यापर, लष्करीकरण यांचे अध्ययन केले जाणार आहे.

प्रकरण चोथे– भारताच्या सुरक्षा आणि विकासात हिंद महासागराचे योगदान.

भारताच्या सुरक्षेमध्ये हिंद महासागराची भूमिका, विकासातील योगदान, नौदल सज्जता, सीमा संरक्षण निती याचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण पाचवे- हिंदी महासागर आणि भारत आजची स्थिती.

हिंद महासागर परिसरातील सत्ता स्पर्धा, त्यांचे परिणाम, भारताचे हितसंबंध, सत्ता संतुलनात भारताची भूमिका, सामूहिक विकास धोरण यासंबंधी चिंतन.

प्रकरण सहावे- सारांश व निष्कर्ष.

सदरील प्रकरणात वरील पाच प्रकरणाच्या अभ्यासातून निष्पन्न झालेले निष्कर्ष व शिफारशी या बाबतची माहिती देण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ :

१) के. एम. पन्नीकर:– इंडिया अँड द इंडियन ओशन, हसेल स्ट्रीट प्रेस प्रकाशन २०२१.

२) फाडीया बी. एल. :– आंतरराष्ट्रीय राजनीती, प्रतियोगिता दर्पण, नई दिल्ली, प्रथम संस्करण, साहित्य भवन प्रकाशन २०२१.

३) एस. झेड. काशीम:– जानिये हिंद महासागर को, प्रभात प्रकाशन 2010.

४) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक:– आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण पुस्तक दोन 2010.

५) एम. सी. सिंह:– आंतरराष्ट्रीय समकालीन विचार, २०१०.

६) कुमार हर्ष:– हिंदी महासागर चुनोतियां और विकल्प, सिन्हा प्रकाशन, २०१२.

७) नकाशे: भारत, जग.

८) वेबसाईट:– मराठी विश्वकोश, विकिपीडिया, ओ. आर. एफ, भारतकोश.

संशोधक
गुलाब चांदसाहेब आळगी.

मार्गदर्शक
प्रा. डॉ. वाय.आर. वळवी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर.